नि.दि.दा.क्र.१११/२०२२
नि.क्र.३४

**उलटतपास वादीकरीता विधीज्ञ श्री.एस.एस.शेख यांच्या वतीने शपथेवर सुरु-**

१६. हे म्हणणे खरे आहे की, वादी माझा दिर आहे. माझ्या पतीपेक्षा वादी हे २५ वर्षे लहान आहे, याबाबत मी सांगू शकत नाही. शेती व्यतिरिक्त माझे पती नोकरी करत होते. हे म्हणणे खरे नाही की, शेती व्यतिरिक्त माझ्या पतीचे गावात स्वस्त धान्याचे दुकान होते. माझ्या पतीला कोणतेही मानसिक आजार नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मृत्यूपर्यंत माझे पती मानसिकरित्या व्यवस्थित होते. आमच्या लग्नाच्यावेळेस माझे सर्व दिर हे वेगळे राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या लग्नापूर्वी माझे पती व त्यांच्या भावांमध्ये वाटप झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, वाटप झाल्यामुळे माझे पती आणि त्यांच्या सर्व भावांचे व्यवहार वेगवेगळे होते.

**प्रश्न** - तुमच्या पतीने त्यांच्या हयातीत वादीने त्यांना फसवून दावा जमिनीचे खरेदीखत लिहून घेतल्याबाबत तुमच्याकडे तक्रार केली होती का ?

**उत्तर** - खरेदीखताबाबत मला कोणतीही माहिती नाही.

**न्यायालयाची वेळ संपल्यामुळे पुढील उलटतपास तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

ASHISH BIHARILAL MARLECHA
Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2026.02.09 17:05:24 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक ०९/०२/२०२६